
# सियावर रामचंद्र की जय..!





रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक १८७
www.ramprahar.com
**राम प्रहर**
मंगळवार, २३ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अयोध्येत मंदिर लोकार्पण, मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**अयोध्या : वृत्तसंस्था**

**अयोध्येतील बहुप्रतिक्षित राम मंदिराचे लोकार्पण आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोमवारी (दि. २२) श्रद्धा आणि भक्तिमय वातावरणात झाला. रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर हेलिकॉप्टरमधून मंदिरावर पुष्पवृष्टी करण्यात आली. अयोध्येसह संपूर्ण देशभर या सोहळ्याचा अभूतपूर्व उत्साह पहावयास मिळाला.**

या सोहळ्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह सेलिब्रिटी, विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मंदिरात आगमन झाल्यावर शंखनाद करण्यात आला, सनई-चौघडे वाजवण्यात आले. यानंतर सभामंडपातून पंतप्रधान मंदिराच्या गाभाऱ्यात आले आणि त्यांच्या हस्ते रामलल्लाची विधीवत पूजा-अर्चा करण्यात आली. ५०० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर राम मंदिरात मूर्ती विराजमान झाली. प्राणप्रतिष्ठेनंतर पंतप्रधान हे प्रभू श्रीरामचरणी लीन झाले. त्यांनी साष्टांग दंडवत घातला.

शिल्पकार अरुण योगीराज यांनी शाळीग्राम दगडापासून घडवलेल्या प्रभू रामाच्या प्रसन्न मूर्तीची पहिली झलक यापूर्वी १८ जानेवारी रोजी समोर आली होती, तर सोमवारी आभूषणांनी, फुलांनी आणि तुळशीच्या पानांनी सजवलेली व पिवळी वस्त्रे धारण केलेली श्रीरामांची पहिली झलक पहायला मिळाली.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने पंतप्रधान मोदींनी ११ दिवस उपवास केला होता. रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी यांच्या हस्ते चरणामृत प्राशन करून पंतप्रधानांनी आपला उपवास सोडला.



### राम मंदिर बांधणाऱ्या हातांचा सन्मान; पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून मजुरांवर पुष्पवृष्टी

राम मंदिर सोहळ्याला उपस्थित असलेल्यांना संबोधित केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मंदिर बांधकामात सहभागी असलेल्या मजुरांचा अनोखा सन्मान केला. त्यांनी मजुरांवर पुष्पवृष्टी केली.

सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयानंतर राम मंदिर बांधकामाचे भूमिपूजन पंतप्रधान मोदींच्या हस्ते २०१९मध्ये करण्यात आले होते. यानंतर एक निश्चित कार्यक्रम आणि नियोजन हाती घेऊन राम मंदिराचे बांधकाम हाती घेण्यात आले. टाटा, एलएनटी यांच्या वरिष्ठ आणि अनुभवी तंत्रज्ञ, कुशल मजूर यांच्या अथक परिश्रमानंतर राम मंदिराचे भव्य रूप देशासह जगासमोर उभे राहिले आहे.



अयोध्येतील श्री राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी कुबेरटीला येथे गेले. तेथे भगवान शंकराची पूजा केली. यानंतर त्यांनी राम मंदिराच्या उभारणीशी निगडित कामगारांवर पुष्पवृष्टी केली आणि या योगदानाचे कौतुक केले.

दरम्यान, राम मंदिर मंगळवारपासून सर्वांसाठी खुले होणार आहे, जी एक पर्वणी असेल.

## एका नव्या कालचक्राची सुरुवात -पंतप्रधान



अनेक शतकांच्या त्याग आणि तपश्चर्येनंतर आपले रामलल्ला आता तंबूत राहणार नाहीत. ते दिव्य मंदिरात राहणार आहेत. २२ जानेवारी २०२४चा हा सूर्य अद्‌भूत आभा घेऊन आला आहे. ही कॅलेंडरवरील तारीख नाही, तर एका नव्या कालचक्राची सुरुवात आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वेळी केले.

अयोध्येत श्रीराम मंदिर लोकार्पण आणि रामलल्लाच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडल्यानंतर पंतप्रधान मोदींनी उपस्थित साधू, संत, निमंत्रित आणि देशवासीयांशी संवाद साधला. त्यांनी या सोहळ्यानिमित्त सगळ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी ते काहीसे भावूकही झाले होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, सर्वांना प्रणाम आणि राम राम! या शुभसमयी आपल्या सर्वांना, संपूर्ण देशाला शुभकामना व अभिनंदन! मी आताच अयोध्येतील मंदिराच्या गाभाऱ्यातून ईश्वरच्या चेतनेचा साक्षीदार होऊन तुमच्यासमोर उभा राहिलो आहे. आजचा जो क्षण आहे त्याबाबत अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, पण कंठ दाटून येतोय. माझे शरीर अजूनही स्पंदीत आहे. मन अजूनही त्या क्षणांमध्ये लीन आहे. माझा पूर्ण विश्वास, अपार श्रद्धा आहे की, मी जो अनुभव घेतला त्याची अनुभूती देशातील, विश्वाच्या कोपऱ्यातील रामभक्तांना होत असेल. हा क्षण अलौकिक आहे. राम मंदिराच्या भूमिपूजनानंतर प्रत्येक दिवस संपूर्ण देशात उत्साह वाढत जात होता. आज त्या उत्साहाचे रूप मी समोरही पाहू शकतो आहे.

आपल्या अनेक पिढ्यांनी जे धैर्य दाखवले त्या धैर्याचा वारसा आज आपल्याला मिळाला आहे. गुलामीची मानसिकता तोडून आपण नवराष्ट्र निर्मिती करतो आहोत. अशाच प्रकारे नवा इतिहास लिहिला जातो. आजपासून एक हजार वर्षांनीही आजची तारीख लक्षात ठेवली जाईल. ही रामाचीच कृपा आहे. आज आपण सगळे हा क्षण जगतो आहोत. आजचा दिवस, दिशा सगळे काही दिव्य झाले आहे. ही वेळ सामान्य नाही. कालचक्रावर केलेली अमिट स्मृती आहे. आपल्याला सगळ्यांना ठाऊक आहे की, रामाचे काम जिथे असते तिथे पवनपुत्र हनुमानही विराजमान असतात. मी आज रामभक्त आणि हनुमानगढीलाही प्रणाम करतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

> **आजच्या दिवसाचा आनंद शब्दांत व्यक्त करता येत नाही इतका आहे. अयोध्येत रामलल्लाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेसह भारताचा स्वाभिमान परतला आहे. संपूर्ण जगाला वेदनांपासून मुक्ती देणारा हा उत्सव ठरणार यात शंकाच नाही**
> **-मोहन भागवत, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

> **आज भावना व्यक्त करण्यासाठी शब्द सापडत नाहीयेत. मन भावूक झाले आहे. तुम्हाला सगळ्यांनाही हेच वाटत असेल. या ऐतिहासिक आणि पावन क्षणी भारतातील प्रत्येक ठिकाण अयोध्याधाम आहे. प्रत्येक मार्ग राम जन्मभूमीच्या दिशेने येत आहे.**
> **-योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश**

पंतप्रधान मोदींनी अयोध्येत भव्य राम मंदिर बांधून पूर्ण झाले. आता पुढे काय, असा सवाल करीत उपस्थितांसमोर नव्या भारताचा एक संकल्प मांडला. आता आपण याच वेळेपासून पुढील एक हजार वर्षांच्या भारताची पायाभरणी केली पाहिजे. मंदिर निर्मितीपासून पुढे जाऊन आता आपण सर्व देशवासीयांनी या घडीपासून एक समर्थ, सक्षम, भव्य, दिव्य भारताच्या निर्मितीची शपथ घेऊया, असे आवाहन पंतप्रधानांनी या वेळी केले.







(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## रायगडात रामनामाच्या गजरात दिवाळी साजरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अयोध्येतील भव्य दिव्य राम मंदिरात श्री रामाच्या मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठापना झाली. यानिमित्त रायगड जिल्ह्यातही विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये भाविकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन प्रभू श्री रामचंद्रांचा जयजयकार केला.

सुमारे पाचशे वर्षांची प्रतीक्षा सोमवारी संपुष्टात आली. शरयू तिरी असलेल्या अयोध्या नगरीत राम मंदिर उभे राहिले आणि या मंदिरात रामलल्ला विराजमान झाले.

### मिरवणुकांसह धार्मिक कार्यक्रमात भाविकांचा सहभाग

हा सोहळा अनेकांनी टीव्ही, मोबाईलद्वारे अनुभवला. काही ठिकाणी एलईडी स्क्रीनचीही व्यवस्था करण्यात आली होती.

राम मंदिर लोकार्पण व मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याचा संपूर्ण देशभर उत्साह दिसून आला. यानिमित्ताने रायगड जिल्ह्यातही ठिकठिकाणी भजन, कीर्तन, प्रवचन आदी कार्यक्रम झाले. त्याचप्रमाणे पालखी, मिरवणुका काढण्यात आल्या होत्या.



## पनवेलमध्ये गीत, अभंग, रथ, पालखीने रामलल्लाचे दर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अयोध्या येथील श्री राम मंदिरात सोमवारी झालेल्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या पूर्वसंध्येला पनवेलमध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मन हे राम रंगी रंगीले हा श्री रामगाथा अर्थात मराठी गीत व अभंगांचा सुश्राव्य कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडला. श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त पनवेल येथे झालेल्या या गीत, अभंग, रथ, पालखीने रामलल्लाचे दर्शन घडविले.



पनवेल शहरातील गुजराती शाळेच्या मैदानावर झालेल्या मन हे राम रंगी रंगीले या सुश्राव्य मराठी गीत व अभंगांच्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सुप्रसिद्ध गायिका सावनी रवींद्र, 'सूर नवा ध्यास नवा' फेम सुप्रसिद्ध गायिका रश्मी मोघे व गायक जयदीप बगवाडकर यांनी श्री रामप्रभूंवरील गीते व अभंग सादर करीत वातावरण भक्तीमय केले. विशेष म्हणजे या ठिकाणी अयोध्येत साकारलेल्या राम मंदिराची प्रतिकृती, भव्य रांगोळी व अयोध्या लढ्यावर आधारित प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. त्याचा हजारो नागरिकांनी अनुभव घेतला. तत्पूर्वी राम मंदिराच्या प्रतिकृतीचे उद्‌घाटन, श्री राम अक्षता कलश पूजन आणि प्रातिनिधिक स्वरूपात पनवेलमधील कारसेवकांचा सन्मान करण्यात आला.

मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेच्या दिवशी प्रभू श्री रामाची पालखी पनवेल शहरातून मोठ्या उत्साहात काढण्यात आली. यानिमित्त मंदिरात आरती झाली तसेच प्रसाद म्हणून लाडूंचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर चौकातून सुरुवात झालेली ही पालखी पुढे हनुमान मंदिर, गावदेवी मंदिर, लक्ष्मी नारायण मंदिर आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मार्गक्रमण करून समारोप गुजराती शाळा येथे झाला. या ठिकाणी अयोध्या येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण, त्यानंतर भाविकांसाठी दर्शन आणि भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या वेळी पनवेलमधील कारसेवकांचा व छोट्या मंदिरांतील पूजाऱ्यांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. सत्कार केलेल्या कारसेवकांमध्ये नंदा ओझे, विजय भिडे, अविनाश कोळी, उमेश मानकामे (पोद्दार), श्यामनाथ पुंडे, अशोक कदम, मकरंद निमकर, सूर्यकांत फडके, अजय आचार्य, रजनीश म्हात्रे, भूषण हजारे, सुधीर चितळे, कमल दाबके यांचा समावेश होता. **(पान २ वर..)**

> तुमच्या-आमच्या मनात आणि जगाच्या इतिहासात २२ जानेवारी २०२४ ही तारीख सुवर्णाक्षरात लिहिली गेली आहे. इथे साजऱ्या होणाऱ्या ४९० वर्षांच्या इतिहासामध्ये आपल्यापैकी प्रत्येक जणाला आधीच्या पिढीने सांगितले की, प्रभू राम हे आपल्या संस्कृतीचे आद्यपुरुष, मानचिन्ह, प्रतिक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनाही बालपणी माता जिजाऊ या रामायण, महाभारत यांचे दाखले देत असत. आपल्या आधीच्या पिढ्यांनीही आपल्यावर संस्कार घडावे म्हणून हे दाखले दिले. त्यामुळे त्या पिढीला सातत्याने वाटत राहिले की आमचा वारसा असलेले श्री रामप्रभू त्यांच्या जन्मभूमीत तंबूमध्ये का? आता पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात अयोध्येमध्ये भव्य राम मंदिर साकारले आहे. आमच्या जिल्हा अध्यक्षांसह अनेक कारसेवकांनी श्री रामप्रभूंचे मंदिर त्या ठिकाणी होण्यासाठी सेवा केली. त्याचा आम्हाला व पनवेलकरांना अभिमान आहे. या सर्वांचे आभार व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे येथे आयोजन करण्यात आले.
> **-प्रशांत ठाकूर, आमदार**

# रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त ठिकठिकाणी जल्लोष

## नवीन पनवेलमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम





**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपुर्ण देशभरात श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापण सोहळा भक्तमिय वातावरणात सोमवारी (दि. २२) साजरा होत आहे. यानिमित्त नवीन पनवेल परिसरात उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शमन घतले.

माजी नगरसेवक संतोष शेट्टी आणि नवीन पनवेलमधील श्री राम भक्त समितीच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे सेक्टर २ येथील जय अंबेमाता मंदिर मैदानात आयोजन केले होते. यामध्ये श्रीराम तारक मंत्र हवन, भक्ती संगीत, प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण, महाप्रसाद तसेच दिपोत्सव असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमांवेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला मोर्चा शहराध्यक्ष राजश्री वावेकर, बेटी बचाओ बेटी पाढाओ च्या उत्तर रायगड अध्यक्ष आरती तायडे, प्रभाग क्रमांक १६ अध्यक्ष शिवाजी भगत, युवामोर्चा प्रभाग १६ अध्यक्ष मयुर आंग्रे, जतेंद्र तिवारी, कुलबीर सिंग चंडोक, शाम शाह, देवेंद्र परब, दशरथ चौलकर, अवधूत बेलेकर हेमंत ठाकूर आदी उपस्थित होते.

दरम्यान, सेक्टर १ येथे भाजप दक्षिण भारतीय सेलचे श्रीनिवास कोडुरू यांच्या वतीने बालाजी मंदिरामध्ये आयोध्या येथे झालेल्या प्रभु श्री रामांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

## उरणमध्ये शोभयात्रा; ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक





**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठापणा कार्यक्रमाच्या निमित्ताने उरण शहरातील राम मंदिर चौकातून सोमवारी (दि. २२) उरणमधील नागरिकांनी निनादात शहरातील मुख्य रस्त्यावरून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या मिरवणुकीची सुरुवात गणपती चौक ते स्वामी विवेकानंद चौक, कामठा मार्ग, पालवी रुग्णालय, बालई मार्गे जारीमरी मंदीर, बाजारपेठ मार्गे पुन्हा गणपती चौकापर्यंत ही मिरवणूक काढण्यात आली.

या राम घोषात निघालेल्या शोभायात्रेचे उरणच्या नागरिकांनी ठिकठिकाणी रांगोळी, पुष्प वर्षाव करीत स्वागत करण्यात आले. तर महिला आणि तरुणांनी राम धुनिवर नृत्य करीत आपला आनंद व्यक्त केला. तर उरण तालुक्यातील चिरनेर, चिर्ले, आवरे, फुंडेसह संपूर्ण तालुक्यातील प्रभू रामाची मंदिरे साजविण्यात येऊन प्रभू रामाचा जयघोष दुमदुमत होता.

या शोभायात्रेत उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांसह शहरातील व्यापारी, स्वयंसेवी संस्थाचे पदाधिकारी, महिला प्रभुरामांच्या वेशभूषा करून शालेय विद्यार्थी ढोलताशाच्या गजरात नाचत प्रभू रामांचा जयघोष करीत नागरिक सहभागी झाले होते. या शोभायात्रेमुळे उरण शहरात प्रवेश करण्यासाठी असलेले काही मार्ग बंद करण्यात आले होते. त्याचप्रमाणे संपूर्ण बाजारपेठ ही बंद होती. या शोभायात्रेमुळे शहरात मोठ्या प्रमाणात उत्साह दिसत होता. उरण शहरात सर्वत्र राम नामाचा जयघोष दुमदुमला होता.



**पनवेल : श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त कल्पतरू सोसायटीच्या वतीने रथ मिरवणुकीचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. ही मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात काढण्यात आली. रथामध्ये राम, सीता आणि लक्ष्मणाची वेशभूषा केलेले चिमुकले सर्वांचे लक्ष आकर्षित करीत होते. या मिरवणुकीत महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अर्चना ठाकूर यांच्यासह कल्पतरू सोसायटीचे रहिवासी मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.** (छाया : विकास म्हात्रे)





**उलवे नोड : श्रीराम जन्मभूमीवर बांधण्यात आलेल्या मंदिरामध्ये प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना, मंदिर राष्ट्रार्पण सोहळ्यानिमित्त उलवे नोड येथे भाजपतर्फे रविवारी मोफत नेत्र तपासणी शिबिर व सोमवारी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांच्यासह हरिपाठ, भजनी मंडळ बामणडोंगरी, मातृशक्ती उलवे नोड या संस्थेचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.**

## करंजाडेत विविध कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : प्रतिनिधी**

अयोध्या येथील श्री राम मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळयानिमित्त सोमवार (दि. २२) रोजी करंजाडे व परिसरात विविध ठिकाणी, मंदिरांमध्ये व सोसायटीमध्ये मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. अनेक सोसायटीमध्ये रांगोळ्या काढून, ध्वज लावून रोषणाई करण्यात आली होती. सकाळी शहरात पायी दिंडी काढण्यात आली.

श्री राम प्राणप्रतिष्ठा सोहळा संपूर्ण देश विदेशामध्ये भक्ती भावाने साजरा होत असताना करंजाडे व परिसरात विविध ठिकाणी, मंदिरांमध्ये व सोसायटी महाआरती करण्यात आली. सेक्टर ६ पासून सकाळी ८ वाजता ज्या प्रमाणे आषाढी वारी ची दिंडी निघते त्याप्रमाणे श्री राम भगवंताचे जय घोष आणि गजर, भजन करत आपण



सर्वजण पायी दिंडी काढण्यात आली. करंजाडे गावातील मारूती मंदिरात सकाळी ६ पासून अभिषेक, भजन झाले, दुपारी महाप्रसाद, त्रिवेणी धाम मंदिर, हवन व प्राणप्रतिष्ठा सोहळा, शिव मंदिर सेक्टर ६ मध्ये पूजन व दीपोत्सव, कालभैरव मंदिर सेक्टर आर २: दिपोत्सव व विविध कार्यक्रम लक्ष्मी नारायण मंदिर सेक्टर आर ३: भजन, प्राणप्रतिष्ठा सोहळा, मिरवणूक, दिपोत्सव व महाप्रसाद चिंतामणी गणेश मंदिर सेक्टर आर ४ मध्ये ही सकाळी कीर्तन, संध्याकाळी भजन करण्यात आले. घरोघरी आणि सोसायटी मध्ये भगवा झेंडा लावण्यात आले होते रांगोळी, दिवे व आकाश कंदील लावून रोषणाई करण्यात आली होती.

सरपंच मंगेश शेलार यांचे मार्गदर्शनाखाली उपसरपंच सागर आंग्रे, ज्येष्ठ नेते कर्णा शेलार, संदेश पाटील, अभिजित धमापूरकर, ओंकार जुमारे, योगेश ठोंबरे, बळीराम म्हात्रे, सुनील भोईर, नंदू भोईर, योगेश शिंदे, गणेश मोरे यांचे सह श्री राम जन्म भूमी तीर्थ क्षेत्र न्यास, करंजाडे परिसर समिती सहभागी झाली होती.

## कळंबोलीत श्रीराम कलश यात्रा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

अयोध्येत श्री रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहात झाली. या पार्श्वभूमीवर सर्वत्र जल्लोष करण्यात येत आहे. कळंबोलीमध्येही श्रीराम कलश यात्रा आयोजित करण्यात आली होती. पोस्ट ऑफिस ते संपूर्ण मार्केटमधून प्रभू श्रीरामांची कलश यात्रा काढण्यात आली.

कलश यात्रेमध्ये बहुसंख्य माता भगिनी यांनी अतिउत्साहात उपस्थिती दर्शविली. तसेच प्रभु श्री रामचंद्र, कलश यात्रेसाठी, सहभागी होण्यास, प्रभाग ९चे भाजप अध्यक्ष घनश्याम शर्माजी (बिंडा), भाजप मंडल उपाध्यक्ष विनोदजी बोरसे, भाजप मंडल सरचिटणीस संजयजी दोडके, भाजप विष्णू गायकवाड तसेच समाजसेवक बलविंदर सिंग, गौतम भाऊ, जय अंबे सोसायटीचे अध्यक्ष श्री शिंदे, तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये किशोरीलाल शर्मा व त्यांचे भजन मंडळी महिला वर्ग मोठ्या संख्येने प्रभू श्रीरामाचा जयघोष करत. कलश यात्रा अतिउत्साहात झाली.







**पनवेल :** येथील व्ही. के. हायस्कूलचे कला शिक्षक रंगनाथ नेरूरकर यांनी श्री रामाला वंदन करीत तुळशीच्या पानावर मनमोहक अशी प्रतिमा रेखाटली आहे. त्या प्रतिमेचा आकार तीन बाय दोन सेंटीमीटर असून ती पूर्ण करण्यासाठी त्यांना एक तासाचा कालावधी लागला. या अप्रतिम प्रतिमेबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



**रसायनी : मोहोपाडा येथील श्री राम मंदिरात भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला. या वेळी डॉ. विदुला सोमण, अनिल सोमण, रेगे मॅडम, रसायनी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष बी. एस. कुलकर्णी, रवींद्र कुलकर्णी, डॉ. विलास कुलकर्णी, आदित्य सोमण, विनय सोहनी, मनोहर कुलकर्णी, दातार, राजश्री कुलकर्णी, सुचेता जोशी, सतीश जोशी व रसायनी ब्राह्मण सभेचे सदस्य उपस्थित होते.**

# कामोठ्यात नमो चषक अंतर्गत रस्सीखेच स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथे नमो चषक अंतर्गत आयोजित केलेल्या रस्सीखेच स्पर्धेचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत आणि माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते रविवारी (दि. २१) झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली नमो चषक अंतर्गत रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन कामोठे मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही भेट देत खेळाडूंना प्रोत्साहीत केले.

या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, कामोठे पोलीस ठाण्याचे वरीष्ठ निरीक्षक अजय कांबळे, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, अमर पाटील, विकास घरत, माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, युवा नेते हॅप्पी सिंग, भाऊ भगत, प्रदीप भगत, महिला मोर्चा अध्यक्षा वनीता पाटील, विद्या तामखेडे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव, कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

भाजप प्रदेश भाजप कार्यकारिणीच्या निर्देशानुसार युवा मोर्चाच्या संयोजनाखाली आयोजित केलेल्या या रस्सीखेष स्पर्धेचे युवा नेते हॅप्पी सिंग, अमोल जाधव, मनोज कवाडे, अजय मोरे, भाऊ भगत, नारायण पोपेटा, अमोल सैद यांनी आयोजन केले होते.





(छाया : अक्षय शार्दूल)

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये मूल्यांकन निरीक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे रयत शिक्षण संस्था, सातारामार्फत शाळा सिद्धी मूल्यांकन पथकामार्फत निरीक्षण झाले. यामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य व पथकाचे अध्यक्ष दशरथ भगत, निरीक्षण पथक प्रमुख मॉडर्न स्कूल इंग्लिश मिडीयम वाशीच्या मुख्याध्यपिका सुमित्रा भोसले, निरीक्षक मंजुषा साळुंखे, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठेच्या सहाय्यक शिक्षिका अश्विनी माने, शर्मिला भोईटे, मॉडर्न वाशी स्कूलचे मुख्य लिपिक यांचा समावेश होता.



या निरीक्षण कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन, स्वागतगीत, रयत गीत व राष्ट्रगीताने झाली. पाहुण्यांचे स्वागत समारंभ झाल्यानंतर पिपीटी प्रेझेंटेशन झाले या वेळी उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे चेअरमन व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर उपस्थित होते. त्यांनी प्रेझेंटेंशन समजून घेतले या निरीक्षण पथकाकडून या कार्यक्रमाची संपूर्ण माहिती घेण्यात आली. तसेच पथकाचे स्वागत करत आभार मानले. मूल्यांकन निरीक्षणासाठी स्कूलतर्फे संपूर्ण सहकार्य लाभेल, अशी हमी स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी दिली.

यानंतर निरीक्षण कामकाजाला प्रारंभ झाले. या पथकामार्फत स्कूलचे सामर्थ स्तोत्र (उपलब्धता–पर्याप्तता–उपयोगिता), अध्यापन–अध्ययन मूल्याकंन, विद्यार्थ्यांची प्रगती, शिक्षकांची कामगिरी व व्यावसायिक विकासाचे व्यवस्थापन, स्कूलचे नेतृत्व व्यवस्थापन, आरोग्य व संरक्षण समावेश आणि उत्पादक समाजाचा सहभाग या प्रमुख सात मुद्याच्या आधारावर स्कूलचे निरीक्षण व मूल्यांकन केले त्या अनुषंगाने सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलला ९२.७५ टक्के इतके गुण मिळाले. यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी पथकाचे आभार मानले व शाळा सिद्धी मूल्यांकन कार्यक्रम झाला, असे जाहीर केले.

संपादकीय

# मंदिर वहीं बनाया है

प्रभू श्रीराम ही आग नसून ऊर्जा असल्याचा उदात्त विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी श्रोत्यांच्या मनात अचूक रुजवला. या ऊर्जेतूनच नव्या भारताच्या निर्माणाचा विचार होणार आहे. रामनामाचा गजर ज्या ऊर्जेतून देशभर या सोहळ्याच्या निमित्ताने झाला, तीच ऊर्जा आता देशहिताच्या विधायक कामांकडे वळवली जाईल यात शंका नाही. पंतप्रधान मोदी यांच्यासारखे डोळस नेतृत्व असल्यानेच याबद्दल खात्री वाटते.

**अयोध्येच्या पवित्र भूमीत राममंदिर उभारण्याची रामभक्तांची प्रतिज्ञा नवीन नाही. १९८०च्या दशकातच राममंदिर उभारणीच्या चळवळीने मूळ धरले होते. 'सौगंध राम की खाते हैं, मंदिर वहीं बनाएंगे' ही एका कवितेतील ओळ नव्वदीच्या दशकात हिंदुत्ववादी मंडळींचे घोषवाक्य ठरले. पाचशे वर्षांचा संघर्षमय इतिहास मागे टाकून अयोध्येत अखेर राममंदिर उभे राहिले आहे. त्या भव्यदिव्य मंदिरात श्रीरामलल्लांची प्राणप्रतिष्ठापना सोमवारी, पौष शुद्ध द्वादशीच्या शुभदिनी मंत्रोच्चारात संपन्न झाली. श्रीराममंदिर इतके देखणे आणि भव्य उभारण्यात आले आहे की बघणाऱ्याचे डोळे दिपून जावेत. त्या मंदिरात विराजमान झालेल्या श्रीरामलल्लांची मूर्ती तर डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. केवळ दर्शनमात्रे उपस्थित निमंत्रितांचे डोळे पाणावत होते. ५१ इंच उंचीची अखंड कृष्ण पाषाणातील ही मूर्ती अरूण योगीराज नावाच्या दक्षिणेतील शिल्पकाराने घडवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तप:सिद्ध हातांनी रामलल्लांची षोडशोपचारे विधिवत पूजा तसेच प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. श्रीरामलल्लांचे भव्य मंदिरात विराजमान होणे हे कार्य पंतप्रधान मोदी यांच्या हस्तेच व्हावे अशी नियतीचीच योजना असणार. किंबहुना, पंतप्रधान मोदी यांच्यासारखे तेजस्वी नेतृत्व भारताला लाभले नसते तर हा दिवस तरी दिसला असता की नाही, कुणास ठाऊक? आपल्या हातून अत्यंत महत्त्वाचे ऐतिहासिक आणि शास्त्रोक्त मंगलकार्य होणार आहे याचे भान ठेवून पंतप्रधान मोदी यांनी ११ दिवसांचे कठोर अनुष्ठान केले. गेले ११ दिवस आपले पंतप्रधान जमिनीवर झोपत होते आणि केवळ नारळपाणी पिऊन सर्व कामे शांतपणे करत होते हे ऐकून सारेच जण थक्क झाले. श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यासाठी देशभरातून हजारो निमंत्रित अयोध्येत आले होते. येथील नव्या कोऱ्या विमानतळावर सकाळच्या वेळेत अनेक विमाने उतरली. अयोध्येतील सर्व रस्ते रामभक्तांनी फुलून गेले होते. नूतन राममंदिराला नेत्रसुखद फुलांची सजावट करण्यात आली होती. शरयुच्या तीरापासून मंदिराच्या गर्भगृहापर्यंत सर्वत्र मंत्रजागर सुरू होता. देशोदेशीचे सुमारे शंभराहून अधिक अतिथी या सोहळ्याला उपस्थित राहिले. अमिताभ बच्चनपासून आलिया भटपर्यंत फिल्मी सिताऱ्यांनीदेखील आपली हजेरी लावली. पंतप्रधान नरेंद्र मोदी भाषणाला उभे राहिले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर ११ दिवसांच्या उपवासाचा आणि अनुष्ठानाच्या थकव्याचा लवलेशही नव्हता. आपले रामलल्ला यापुढे तंबूत राहणार नाहीत, ते या भव्य मंदिरात राहणार आहेत असे निर्धारपूर्वक जाहीर करतानाच पंतप्रधानांनी हा विजयाचा क्षण नसून विनयाचादेखील आहे, याकडे आवर्जून लक्ष वेधले. राममंदिर आंदोलनाच्या कळसाध्यायाच्या वेळी उन्मादाच्या भरात आपल्याच भक्तांकडून काही आगळीक होऊ नये याची पंतप्रधान किती काळजी घेतात हेच त्यामुळे अधोरेखित झाले. त्यांच्या ३५ मिनिटांच्या भाषणातील सारेच मुद्दे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी एक वस्तुपाठ ठरतील. कडवट इतिहासावर मात करून पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांचे एक मोठे स्वप्न साकार करून दाखवले याबद्दल त्यांचे अभिनंदन करायलाच हवे.**

# थेंबा-थेंबातून सिंचनासाठी सूक्ष्म सिंचन योजना

उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब पिकांच्या पोषक वाढीसाठी उपयुक्त ठरावा. पिकांची उत्पादकता वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट व्हावे यासाठी कृषी विभागाच्या माध्यमातून विविध योजना राबविण्यात येतात. त्यापैकीच एक योजना म्हणजे राष्ट्रीय कृषी विकास योजना- प्रतिथेंब अधिक पीक अर्थात सूक्ष्म सिंचन योजना होय.

राज्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रती थेंब व अधिक पीक ही सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये केंद्र सरकारचा ६० टक्के आणि राज्य शासनाचा ४० टक्के हिस्सा असतो. राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. ठिबक व तुषार संच उभारणीसाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के, तर इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत देण्यात येते.

जिल्हानिहाय वार्षिक कृती आराखड्यांवरून राज्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करून राज्यस्तरीय मंजुरी समितीची मान्यता घेण्यात येते. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून योजनेसाठी सर्वांच्या सर्व चार हप्ते मिळवणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

या योजनेतून शेतकरी लाभार्थीस अनेक फायदे झालेले आहेत. ठिंबक सिंचनामुळे पाणी थेट पिकाच्या मुळाशी व आवश्यक त्या प्रमाणात दिले जाते, त्यामुळे पाण्याची बचत होते. ठिंबक सिंचनामुळे जमिनीत वाफसा कायम राहतो. विद्राव्य खाते वेंचुरी/फर्टिलायझर टॅकद्वारे पाण्यात मिसळून पिकांच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार देता येतात. त्यामुळे पाण्याची व खतांची बचत होऊन खतांचा अधिक कार्यक्षमतेने वापर होतो. तणांची वाढ नियंत्रित राहते, विजेच्या व मजुरांच्या खर्चात बचत होते. पिकांच्या उत्पादनात व गुणवत्तेत वाढ होऊन दर्जेदार व निर्यातक्षम उत्पन्न मिळते आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावते.

सन २०२२-२३ मध्ये या योजनेसाठी एकूण ५५६.६६ कोटी रुपये निधी उपलब्ध झाला. या निधीमधून सन २०२१-२२ मधील प्रलंबित लाभार्थ्यांकरिता व सन २०२२-२३ मधील महाडीबीटी पोर्टलवर निवड झालेले व अनुदानास पात्र दोन लाख २२ हजार २२५ लाभार्थ्यांना ५५६.६६ कोटी रुपये अनुदान वितरित करण्यात आले आहे. सन २०२२-२३ मध्ये एकूण १.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर सूक्ष्म सिंचनाचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२३-२४ साठी ५०९.९९ कोटी रुपये रकमेचा वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे. यापैकी १०२.०८ कोटी रुपये निधी प्राप्त झाला असून सन २०२२-२३ मधील प्रलंबित आणि सन २०२३-२४ महाडीबीटी पोर्टलवर निवड झालेले व अनूदानास पात्र ३२ हजार १८६ लाभार्थ्यांना ८०.६१ कोटी रुपये अनुदान वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.



कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या सोयीकरीता सर्व योजनांचा लाभ देण्यासाठी महाडीबीटी प्रणाली विकसीत केली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या घटकांच्या निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आले असून शेतकऱ्यांना शेतीशी निगडीत विविध घटकांकरिता अर्ज करण्याची सुविधा या प्रणालीद्वारे करून देण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करून आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. महाडीबीटी पोर्टलचे https://mahadbt.maharashtra.gov.in/ हे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळावरील शेतकरी योजना हा पर्याय निवडावा. शेतकरी स्वतःच्या मोबाईल, संगणक/लॅपटॉप/टॅबलेट,सामुदायिक सेवा केंद्र (CSC), ग्रामपंचायतीतील संग्राम केंद्र इ. माध्यमातून उपरोक्त संकेतस्थळावर जाऊन अर्ज करू शकतात.

योजनेच्या प्रसारासाठी तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा यासाठी राज्य शासन खालीलप्रमाणे प्रोत्साहनपर पूरक अनुदानाच्या योजना राबवित आहे.

**अ) मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना :**

राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत देय अनुदानास राज्य शासनाकडून मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेमधून अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देऊन सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे ८० टक्के व ७५ टक्के एकूण अनुदान देण्यात येत आहे. सन २०२१-२२,२०२२-२३ व २०२३-२४ मधील लाभार्थ्यांना पूरक अनुदान देण्याकरिता राज्य शासनाकडून रु. ४६४ कोटी निधी प्राप्त झाला. यातून पात्र ३ लाख १४ हजार २५२ लाभार्थ्यांना रु.४१८.७३ कोटी पूरक अनुदान देण्यात आले.

**ब) अटल भूजल योजना :**

ही योजना १३ जिल्ह्यातील ४२ तालुक्यातील १३३९ ग्रामपंचायतीमधील १४४० गावांमध्ये केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या अर्थसहाय्याने पाच वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक आणि इतर शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे २५ टक्के आणि ३० टक्के पूरक अनुदान देण्यात येत आहे.

**-दत्तात्रय कोकरे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे

बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. आज त्यांची जयंती आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

बाळासाहेब ठाकरेंनी सर्वप्रथम एक व्यंगचित्रकार म्हणून सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. इ.स. १९५०मध्ये ते 'फ्री प्रेस जर्नल'मध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. पुढील काळात त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काळ काम केले. 'फ्री प्रेस जर्नल'मध्ये काम करीत असतानाच ठाकरे विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी चित्रे, व्यंगचित्रे, जाहिरातीचे डिझाइन या क्षेत्रांतही काम करीत असत.

बाळासाहेबांनी नोकरी सोडून स्वतःचे साप्ताहिक (व्यंगचित्रात्मक) काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार त्यांनी ऑगस्ट १९६०मध्ये मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिकासाठीचे हे नाव बाळासाहेबांना वडील प्रबोधनकारांनी सुचविले होते. मराठीतील हे पहिले व्यंगचित्र साप्ताहिक ठरले. 'मार्मिक'च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. या समारंभास प्रा. अनंत काणेकरही उपस्थित होते. महाराष्ट्रात येऊन मराठी माणसाबद्दल अनादर बाळगणाऱ्यांना



ठाकरेंनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून टीका केली. १९६०पासून ते राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य स्तरावरील प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीत तसेच इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर मराठीजनांना मार्गदर्शन करीत 'मार्मिक' अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असे. ठाकरे लहान मुलांसाठीच्या श्याम या पाक्षिकाचेसुद्धा संपादक होते.

बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. वक्तृत्वाबरोबरच ठाकरे भेदक लेखनदेखील करत. प्रबोधनकार ठाकरे व प्रल्हाद केशव अत्रे यांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. शिवाय व्यंगचित्रकाराची वेधक-वेचक निरीक्षणदृष्टीही त्यांच्यामध्ये होती.

झुणका भाकर केंद्रांची योजना, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टीवासीयांना घरे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, बॉंबेचे मुंबई नामकरण अशा अनेक योजना-प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांची होती. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईत मातोश्री या निवासस्थानी बाळासाहेबांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**




## भारतात लाँच होणार वनप्लस १२ सीरिज

वनप्लस या स्मार्टफोनची OnePlus १२ ही सीरिज येत्या २३ जानेवारी २०२४ रोजी भारतामध्ये लाँच होणार आहे. त्याच दिवशी OnePlus buds ३देखील लाँच होणार आहे, परंतु चिनी मार्केटमध्ये आधीच हे स्मार्टफोन लाँच झाले आहेत. त्यानुसार आपण भारतामध्ये OnePlus १२ सीरिजची किंमत काय असू शकते याचा अंदाज बांधू शकतो. तर या स्मार्टफोनमधील फीचर्स काय आहेत ते पाहूया.



OnePlus १२ व्हेरियंट हा पॉवर्डबाय Qualcomm Snapdragon ८ Gen 3 chipset असल्याने अत्यंत उत्कृष्ट काम करतो. त्यासह AI टास्कदेखील सहजतेने त्याला करता येतात तसेच यामध्ये १६ GB रॅम आणि ५१२GB इतके स्टोरेज आहे. डिस्प्लेबद्दल बोलायचे झाले, तर यामध्ये ६.८२ इंचाचा LTPO -MOLED पॅनल तंत्रज्ञान वापरणारा डिस्प्ले आणि २K रिसोल्यूशन + १२०nits ब्राईटनेस आहे, त्यामुळे स्क्रीनवर कोणतीही गोष्ट पाहताना वापरकर्त्याला अतिशय सुंदर अनुभव मिळू शकतो.

हसल्ब्लेड Hasselblad ट्रिपल रेअर कॅमेरा सेटअप बसवण्यात आला आहे. ज्यामध्ये ४८MP वाईड अँगल लेन्स, ४८MP अल्ट्रा वाईड अँगल लेन्स, ६४MP टेलिफोटो लेन्स आणि 3x टेलिफोटोची क्षमता असणारी लेन्स देण्यात आली आहे, तर सेल्फी आणि उत्तम दर्जाच्या व्हिडीओ कॉलसाठी ३२MP फ्रंट कॅमेरा दिलेला आहे.

OnePlus१२मध्ये ५,४००mah बॅटरी बसवण्यात आलेली आहे, जी १००W इतक्या फास्ट चार्जिंगला सपोर्ट करते. या फोनमध्ये सी टाईप यूएसबी पोर्ट दिलेला आहे. केवळ २६ मिनिटांमध्ये हा फोन ० ते १००% चार्ज होऊ शकतो. इतकेच नाही, तर ५०W गतीने वायरलेस चार्जिंगदेखील केले जाऊ शकते, अशी माहिती एका लेखावरून समजते.

हा फोन अँड्रॉइड १४वर काम करीत असून यामध्ये कस्टमाईझ्ड OxygenOS १४ इंटरफेस देण्यात आलेला आहे.

OnePlus १२R६.७८ इंचाचा LTPO AMOLED डिस्प्ले, १२०Hz रिफ्रेश रेट आणि १.५K रिसोल्यूशनसह देण्यात आलेला आहे. ४,५००nits ब्राईटनेस तुम्हाला दिवसाच्या प्रकाशात, घराबाहेरदेखील स्क्रीन अगदी स्पष्टपणे दाखवण्यास मदत करतो.

# प्रखर देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस

भारतीय राष्ट्रवादी सुभाषचंद्र बोस यांच्या देशभक्तीने अनेक भारतीयांवर कायमची छाप सोडली आहे. ते आझाद हिंद फौज या संघटनेची स्थापना करण्यासाठी प्रसिद्ध राहिले आहेत आणि तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दुंगा अशी त्यांची घोषणा सर्वांना माहीत आहे.

मुक्ती सेनानी, सुभाषचंद्र बोस यांच्याकडे अपवादात्मक नेतृत्व गुण होते आणि ते एक करिष्माई वक्ते होते. त्यांनी आझाद हिंद फौज स्थापन केली आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात अनेक योगदान दिले. ते त्यांच्या समाजवादी धोरणांसाठी तसेच स्वातंत्र्य मिळवण्यासाठी वापरलेल्या सशक्त रणनीतींसाठी प्रसिद्ध आहे.

प्रभावती दत्त बोस आणि जानकीनाथ बोस यांचे पुत्र, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक, ओडिशा येथे झाला. त्यांच्या वडिलांना रायबहादूर ही पदवी होती आणि ते एक प्रसिद्ध वकील होते. आपल्या भावंडांप्रमाणे, त्याने कटक येथील प्रोटेस्टंट युरोपियन शाळेत शिक्षण घेतले, जे आता स्टीवर्ट हायस्कूल आहे. प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

वयाच्या १६व्या वर्षी सुभाषचंद्र बोस यांचे लेखन वाचल्यानंतर स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण यांच्या शिकवणींचा त्यांच्यावर प्रभाव पडला. त्यानंतर भारतीय नागरी सेवेची तयारी करण्यासाठी त्यांच्या पालकांनी त्यांना इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात पाठवले.



**निमित्त**

१९२०मध्ये त्यांनी नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली, परंतु एप्रिल १९२१मध्ये भारतातील राष्ट्रवादी गदारोळ ऐकल्यानंतर त्यांनी उमेदवारीचा राजीनामा दिला आणि घाईघाईने भारतात परतले.

भगवद्गीतेचा सुभाषचंद्र बोस यांच्यावर प्रभाव होता आणि त्यांनी ते इंग्रजांविरुद्धच्या लढ्यासाठी प्रेरणास्त्रोत म्हणून पाहिले. लहानपणापासूनच त्यांच्यावर स्वामी विवेकानंद यांच्या वैश्विक आणि राष्ट्रवादी विचारांचा खूप प्रभाव होता. त्यांनी 'स्वराज' वृत्तपत्राची स्थापना केली.

सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी बोस बंगालच्या क्रांतिकारक गटाशी संबंध ठेवल्याबद्दल नजरकैदेत होते. तुरुंगात असताना ते कलकत्त्याचे महापौर झाले. त्यानंतर त्यांना सोडण्यात आले आणि क्रांतिकारी गटांशी संबंध असल्याच्या संशयावरून अनेक वेळा ताब्यात घेण्यात आले. शेवटी तब्येत खराब असल्याच्या कारणास्तव त्यांना सोडण्यात आले आणि सरकारने युरोपला जाण्याची परवानगी दिली. १९३६मध्ये ते युरोपमधून परतले आणि सुमारे एक वर्ष नजरकैदेत राहिले.

सुभाषचंद्र बोस यांनी १९४१मध्ये नजरकैद टाळली आणि वेश परिधान करून भारत सोडला. अडॉल्फ हिटलर त्यांना भेटला आणि त्यांना नाझी जर्मनीकडून पाठिंबा मिळू लागला. त्यांनी बर्लिनमध्ये फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली आणि भारतीय सैन्याची भरती केली, ज्यांनी पूर्वी उत्तर आफ्रिकेत ब्रिटीशांसाठी लढा दिला होता आणि अक्ष सैन्याने पकडले जाण्यापूर्वी भारतीय सैन्याची स्थापना केली.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूरमध्ये स्वतंत्र भारताच्या तात्पुरत्या प्रशासनाची (आझाद हिंद) स्थापना करण्याची घोषणा केली. अंदमानमध्ये, ज्यावर जपान्यांनी पूर्वी कब्जा केला होता, सुभाषचंद्र बोस १८ ऑगस्ट १९४५ रोजी एका विमान अपघातात मरण पावले, आयएनए सैन्याने पकडले किंवा आत्मसमर्पण केले आणि ते तैवानमार्गे टोकियोला जात होते. १८ ऑगस्ट १९४५ रोजी तैपेह, तैवान (फॉर्मोसा) येथे विमानाच्या धडकेत ते ठार झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**रेवदंडा : चौल परिसरात अनेक प्राचीन मंदिरे तसेच वास्तू आहेत. सराईनजीक कलावंतीणीचा वाडा हा त्यापैकीच एक आहे. मुसलमानी पद्धतीचा आदिलशाही व निजामशाही राजवटीच्या काळात करमणुकीसाठी हा वाडा बांधला असावा असे सांगितले जाते.**

## आरोग्य प्रहर

## सकाळी उठल्यावर न चुकता करा तीन गोष्टी

रोज सकाळी उठल्यावर छान फ्रेश आणि एनर्जेटीक वाटावे अशी आपली इच्छा असते. मात्र काही ना काही कारणाने आपल्याला सकाळी उठल्यावर डाऊन वाटते. कधी झोप पूर्ण झाली नाही म्हणून, तर कधी आरोग्याच्या काही तक्रारींमुळे इतर ताणतणाव यांसारख्या गोष्टींमुळे सकाळी उठल्यावर फ्रेश वाटत नाही, पण सकाळी फ्रेश वाटलं नाही तर आपला पूर्ण दिवस आळसात आणि कंटाळवाणा जातो. असं होऊ नये आणि सकाळी उठल्यापासून आपल्याला फ्रेश वाटावं यासाठी उठल्यावर काही गोष्टी करणं आवश्यक असतं. प्रसिद्ध आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. हंसाजी योगेंद्र सकाळी उठल्यावर काय करावं याबाबत तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगतात. मॉर्निंग रुटीनमध्ये या गोष्टींचा समावेश केल्यास दिवस छान जायला मदत होईल.



**प्राणायमाचे महत्त्व**

आपण दिवसभर श्वास घेत असतो, पण त्या श्वासाकडे आपण लक्ष देतोच असं नाही, मात्र सकाळच्या वेळी लक्षपूर्वक श्वासावर लक्ष दिल्यास त्याचा आपल्या दिवसावर अतिशय सकारात्मक परीणाम होतो. श्वासाशी निगडीत विविध प्राणायाम प्रकार केल्याने दिवस चांगला जाण्यास मदत होते. आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर या प्राणायमाचा चांगला परीणाम होतो.

**नाश्त्याबाबत लक्षात ठेवा**

सकाळी उठल्यावरचे पहिले खाणे म्हणजेच नाश्ता आपल्या आहारातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट असते. हा नाश्ता शरीराला पोषण देणारा असेल तर आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. नाश्ताला आहारात प्रोटीन्स म्हणजेच प्रथिने असल्यास पोट भरण्यास, स्नायू बळकट होण्यास आणि प्रतिकारशक्ती चांगली राहण्यास मदत होते. दिवसभर ऊर्जा टिकून राहण्यास आणि रक्तातील साखरेचे प्रमाण योग्य राहण्यासही प्रोटीन महत्त्वाचे असते. यामध्ये शाकाहारी पदार्थांतील डाळी, पनीर, चीज, कडधान्य यांचा समावेश होऊ शकतो. यात भाज्या आणि धान्यांचा समावेश केल्यास हे पदार्थ जास्त पोषण देणारे ठरतात.

**सूर्यप्रकाश अंगावर घेणे**

सूर्यप्रकाश हा आपल्या एकूण आरोग्यासाठी अतिशय आवश्यक गोष्ट असते. सकाळच्या वेळी झोपेचे वेळापत्रक चांगले ठेवण्यासाठी, व्हिटॅमिन डी मिळण्यासाठी आणि दिवसभरासाठीची ऊर्जा टिकून राहण्यासाठी सूर्यप्रकाश अतिशय गरजेचा असतो. शरीरात सेराटोनिन या आनंदाच्या हार्मोनची निर्मिती व्हावी यासाठीही सूर्यप्रकाश अतिशय गरजेचा असतो. यामुळे मूड सुधारण्यास मदत होते, त्यामुळे रोजच्या रोज थोडा तरी सूर्यप्रकाश अंगावर आवर्जून घ्यायला हवा.

# रामनामाच्या जयघोषाने अलिबाग नगरी दुमदुमली

## रॅली, पालखी काढून आनंदोत्सव केला साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अयोध्येत राम मंदिरात सोमवार (दि. २२) श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. या सोहळ्याचा जल्लोष संपूर्ण भारतात करण्यात आला. अलिबाग नगरीदेखील रामनामाच्या जयघोषात दुमदुमून गेली. जय श्री राम... जय सिया राम... छत्रपती शिवाजी महाराज की जय असा नारा देत मिरवणुका काढण्यात आल्या. आसपासच्या गावामध्ये दिंडी, पालख्या काढण्यात आल्या. गावोगावच्या मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सगळीकडे धार्मिक वातावरण होते.

इतक्या वर्षांपासून ज्या क्षणाची भारतवासी वाट पहात होते, ज्यासाठी न्यायालयीन लढे लढले गेले, त्या रामजन्मभूमीत अखेर राममंदिर उभे राहिले. त्यात श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रिष्ठापना सोमवारी करण्यात आली. सारा देश या क्षणाने भारावून गेला. सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते.





अलिबाग शहरात सोमवारी सकाळी काढण्यात आलेल्या बाईक रॅलीमध्ये शेकडो रायडर्स सहभागी झाले होते. त्यात तरुण– तरुणी मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचे पहायला मिळाले. जय श्रीरामचा नारा देत काढण्यात आलेल्या रॅलीने अलिबागकरांचे लक्ष वेधून घेतले. अलिबागपासून जवळच असलेल्या आक्षी– साखर गावातही पालखी मिरवणूक काढण्यात आली. लहान मुलांना राम– लक्ष्मण– सीता अशी वेशभूषा करून या मिरवणुकीत सहभागी करून घेतले.

बालाजी मंदिरात सकाळी होमहवन करण्यात आले. रामनाथ, वरसोली, ब्राह्मण आळी येथील राममंदिरात देखील धार्मिक विधी पार पडले. भजन, कीर्तन, महाप्रसाद, इतर सांस्कृतिक कार्यक्रम या सोहळ्यानिमित्त ठिकठिकाणी आयोजित करण्यात आले होते. श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरांमध्ये गर्दी केली होती. दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. बाजारात रामनामाचे झेंडे खरेदी करण्यासाठी गर्दी पहायला मिळाली. दुचाकी, चारचाकी, रिक्षा यावर हे झेंडे फडकत होते. संपूर्ण शहर रामनामाच्या पताकांनी सजले होते.

# रातवड विद्यालयात श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात आयोध्येमध्ये झालेल्या प्रभू रामचंद्र मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा सोमवारी (दि.२२) उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त विद्यालयात मुखयाध्यापक महादेव जाधव यांच्या हस्ते गुढी उभारण्यात आली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

लेझीम पथकाचे हलगीच्या तालावर प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विद्यालयात श्रीरामरक्षा स्तोत्र पठण, प्रभू श्रीरामचंद्र प्रतिमापूजन व प्रत्यक्ष लाईव्ह प्रक्षेपण विद्यार्थ्यांनी पाहिले.

भव्य अशा रांगोळ्या व सजावट करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना श्रीराम प्रसाद देण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी तयारी केली. विविध वेशभूषेत विद्यार्थी या सोहळ्यात उपस्थित होते.




# इंदापूर विभागात विविध विकासकामांचे भूमिपूजन



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील इंदापूर विभागातील नगरोली येथे सभागृह व पोटणेर येथे मुंबई–गोवा महामार्ग ते पोटणेर गावरस्त्याचे भूमिपूजन महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सोमवारी (दि. २२) झाले.

या वेळी पोटणेर ग्रामस्थ व महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. रायगड जिल्हा उपाध्यक्ष शेखर देशमुख, राज्य सचिव तथा ग्रा. पं. भुवन सरपंच, दिपक जाधव, विभागीय अध्यक्ष काका नवगणे, युवती अध्यक्ष सायली दळवी, तालुका उपाध्यक्ष श्रद्धा यादव, युवक अध्यक्ष रुपेश तोडकर, ओबीसी जिल्हाध्यक्ष गणेश पवार, उपसरपंच समीर मेहता, शुक्रादास मोरे, संतोष सांगळे, संतोष यादव, दिलीप शिंदे, सुमित पडवळ, नितीन घोणे, नगरोली व पोटणेर ग्रामस्थ उपस्थित होते.

नगरोली येथे १० लाख रु. खर्च करून सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले. पोटणेर येथे कोणतीही विकासकामे मागील काही वर्षात करण्यात आली नाहीत. खासदार सुनील तटकरे व ना. आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असल्याचे प्रवेशकर्त्यांनी यावेळी सांगितले.

या वेळी ना. आदिती तटकरे म्हणाल्या की, आपण आमच्यावर जो विश्वास दाखवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलाय तो आम्ही सार्थ ठरवू. तुम्हाला विकासकामांबाबत कोणतीही कमतरता पडणार नाही. आज संपूर्ण देशभरात राममंदिर प्रतिष्ठापनेचा सोहळा पार पडत असून तुम्ही शुभमुहूर्तावर प्रवेश केला आहे. प्रवेशकर्त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करून पोटणेर ग्रामस्थ व महिलांचे आभार मानले.

# पेणच्या बेणसे झोतिरपाड्यात महाआरती आणि पालखी

**पाली : प्रतिनिधी**

बेणसे झोतिरपाडा येथील हनुमान मंदिरात अयोध्येतील प्रभू श्री रामाच्या भव्य मंदिर उद्घाटन आणि श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने महाआरती आणि श्रीरामाच्या जयघोषात भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.

शिहू, चोळे गांधे, कुहिरे, शेतजुई, बेणसेवाडी या ठिकाणीदेखील धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त शेकडोच्या संख्येने डोक्यावर कलश घेऊन महिला या महाआरतीमध्ये सहभागी झाल्या. महाप्रसाददेखील देण्यात आला. प्रभू श्री रामाच्या घोषणानी मंदिर दणाणून गेला होता. तरुण तरुणी आबालवृद्ध महिला सारेच अत्यंत भक्तिमय व आंनददायी वातावरणात तल्लीन झाले होते. या सोहळ्यानिमित्त बेणसे गावात सर्वत्र घरोघरी अंगणात रांगोळी तर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. वाहनांवर, घरांवर भगवे झेंडे लावल्याने वातावरण भगवेमय झाले होते.



# जिल्ह्यात थंडी वाढली

**रायगड : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी ढगाळ वातावरणामुळे जाणावणारी उष्णता पूर्णता नाहिशी झाली असून जानेवारीच्या शेवटाला जिल्ह्यात गुलाबी थंडीचा अनुभव नागरिक घेत आहेत. अलिबाग, महाड, पोलादपूर, खोपोली, रोहा, माथेरान यांसह सर्वच ठिकाणी थंडीने चांगलाच जोर धरला आहे. त्यामुळे नागरिकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे.


॥ श्री ॥

**सदगुरु ज्योतिष (पनवेल)**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | २ | १२ | ११ |
| | ४ | १ / १० | |
| ५ | ६ | ७ / ८ | ९ |

कॉम्प्युटराईअ, जन्मकुंडली बनवून मिळेल
शुभ कार्यासाठी पंचाग मुहुर्त, विवाह गुणमेलन
वैयक्तिक समस्यांसाठी कुंडलीद्वारे सल्ला मार्गदर्शन
ओरीजनल नवग्रह रत्न । उपरत्न मिळतील'

**संपर्क :– सदगुरु ज्योतिष १६०सुमित्रा सदन, शॉंप ने १ केतकी हॉटेल समोर, शिवाजी रोड पनवेल जि. रायगड.**

**मो. नं.९७०२९३५३२८/९०२९८५०५८०**


# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात रामरक्षा पठण

**रोहे : प्रतिनिधी**

अयोध्येत प्राणप्रतिष्ठा सोहळा होत असताना तालुक्यातील वरसे येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे रामरक्षा पठण करण्यात आले.

श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात गुढी उभारण्यात आली. या ठिकाणी श्री स्वामी समर्थ सेवेकरी बंधू भगिनींनी सामुदायिक श्री रामरक्षा पठण, श्री हनुमान चालीसा, श्रीराम मंत्र जप, श्री स्वामी समर्थ मंत्र जप अशी अध्यात्मिक सेवा करून प्रभू रामचंद्र चरणी प्रार्थना पुर्वक अक्षता समर्पित केल्या आहेत.



# कर्जतमध्ये नागरिकांनी साजरी केली दिवाळी

**कर्जत : प्रतिनिधी**

आयोध्येत प्रभू श्रीरामांची प्राणप्रतिष्ठा होत असताना कर्जत तालुक्यात दिवाळी साजरी करण्यात आली. कर्जत, नेरळ आणि माथेरान शहरातील अनेक मंदिरांमध्ये प्राणप्रतिष्ठा करण्याच्या मुहूर्तावर श्री रामांचे पूजन करण्यात आले होते. भाजप किसान मोर्चाचे वतीने वनवासी वाड्या वस्तीमध्ये प्रभु श्रीराम यांच्या मंदिर लोकार्पण कार्यक्रमाचे औचित्य साधून किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांच्या संकल्पनेतून सुमारे ३०० प्रभु श्रीरामांच्या मूर्तींचे लोकार्पण पार पडले.



चौकामध्ये मोठ्या स्क्रीनवर आयोध्येतील प्राणप्रतिष्ठेचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. गुजराथी समाज बांधवांनी श्री रामांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला होता. यामध्ये अबालवृध्द नी सहभाग घेतला होता. उल्हास नदीच्या काठावर शेकडो दीप उजळवून दीपोत्सव साजरा केला.

भाजपच्या वतीने येथील टिळक चौकात शामियाना उभारून अयोध्येतील सोहळ्याचे मोठ्या स्क्रीनवर थेट प्रक्षेपणाची व्यवस्था करण्यात आल्याने नागरिकांनी हा सोहळा डोळे भरून पहिला. श्री कपालेश्वर मंदिरात श्री रामाचे पूजन करण्यात आले व किशोर ठाकरे उभयतांच्या हस्ते होम हवन करण्यात आले. वेणगाव येथील श्री महालक्ष्मी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दहिवली येथील विठ्ठल मंदिरातसुद्धा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्री राधाकृष्ण मंदिरात श्री रामांचा नामजप, अभिषेक, दीपोत्सव व भजन कीर्तनाचे आयजन करण्यात आले होते. नेवाळी (इनाम) येथील रवींद्र बेलोसे यांनी उभारलेल्या श्रीराम मंदिरात श्री रामांचा अभिषेक सोहळा, सामुदायिक हरिपाठ, दीपोत्सव व सोंगी भारुडाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री विठ्ठलाच्या मूर्तीच्या परिसरात सायंकाळी दीपोत्सव करण्यात आला.


**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित**

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

म.रा.र.वि.म.

के.सी. मार्ग, वांद्रे रेक्लमेशन बस डेपोसमोर, वांद्रे (प.), मुंबई– ४०० ०५०.
**दूरध्वनी:** ०२२ २६५१ ७९३८ **संकेतस्थळ:** www.msrdc.in
**ई–निविदा पोर्टल:** https://mahatenders.gov.in
**ई–मेल:** coastalroad.msrdc@gmail.com
**सीआयएन:** U45200MH1996SGC101586

**ई–निविदा मागविण्याबाबत जाहीर सूचना**

**महाराष्ट्र राज्यातील, रायगड जिल्ह्यातील रेवस–रेडी सागरी महामार्गाच्या संरेखेवर असणाऱ्या (प्र.रा.मा.–४) आगरदंडा ता. मुरुड आणि दिघी ता. श्रीवर्धन जि. रायगड यांना जोडणाऱ्या खाडीवर, दोनपदरी पुलाचे पोचमार्गासह इ.पी.सी. तत्वावर बांधकाम करणे.**

उपरोक्त कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. मार्फत इच्छूक निविदाकारांकडून ई–निविदा प्रणालीद्वारे साक्षांकित निविदा ३६ महिने कालावधीसाठी पात्र कंपन्यांकडून मागविण्यात येत आहेत.

- निविदा संच **http://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर दि. २३.०१.२०२४ ते दि २६.०२.२०२४ या कालावधीमध्ये पाहण्यासाठी/डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील.
- निविदा सादर करण्याचा अंतीम दि. २६.०२.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत.
- निविदापूर्व बैठक दि. ३१.०१.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. म.रा.र.वि.म. वांद्रे मुंबई–५० येथे.
- इच्छूक निविदाकारांनी निविदा संचाची किंमत रू. १०,००,०००/– अधिक जी.एस.टी. अदा करावयाची आहे.
- कोणत्याही कारणाने, कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधीकार म.रा.र.वि.म. मर्या. यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
**म.रा.र.वि.म. मुंबई**


# मुरूडमध्ये जल्लोषात मिरवणूक; कारसेवकांचा सत्कार

**मुरुड : प्रतिनिधी**

१९९२ साली अयोध्येत कारसेवक म्हणून गेलेले उमेश केशव गोबरे यांचा विशेष सत्कार बाजारपेठ तरुण मित्र मंडळातर्फे डॉ. राज कल्याणी यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांना शाल श्रीफळ सन्मानचिन्ह व पुष्पगुछ देऊन सन्मानित करण्यात आले.

१९९२ साली कारसेवक म्हणून गोबरे अयोध्येत जाऊन महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. जीवाची पर्वा न करता ते मोठ्या उत्सहात सहभागी झाले होते. त्यांच्या कार्याची दखल बाजारपेठ व्यापारी व डॉक्टरांनी घेत हा विशेष सत्कार करण्यात आला.सत्कार स्वीकारताना त्यांच्या पत्नी तनुजा गोबरे व मुले उपस्थित होते.

या वेळी डॉ. मयूर कल्याणी, डॉ. भाविका कल्याणी, डॉ. सुनील पटेल, जैन समाजाचे अध्यक्ष हसमुख जैन, सचिन शहा, कीर्ती शहा, व्यापारी बँकेचे चेअरमन संदीप पाटील, व्यापारी आसोशिएशनचे अध्यक्ष नितीन आंबुर्ले, नगेंद्र सिंह, राहुल कासार, राजू संघवी, सिद्धेश करंबे आदी उपस्थित होते.








MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-24/23-24/Rfx No.7000029131 | E-tender for work of providing tower earthing of 400 kV Nagothane Dabhol 1 & 2 ckt under 400 kV line maint s/dn under 400 KV RS (O & M) Division Nagothane....2nd call | Rs. 21,37,250/- | 28.01.2024 up to 23.59 hrs |

**EMD** 1% of Estimate cost & Tender fee Rs. 500/- + GST for further details visit our website https://srmtender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (DYEE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना कळविण्यात येते की, खाली नमुद निवासी सदनिका मिळकत मिळकतीचे मालक **शान शेख, रा. ए–५–३०२, हाईड पार्क सोसायटी, प्लॉट नं. ८, ९, १०, टाटा कॅन्सर हॉस्पिटल जवळ, सेक्टर ३५जी, खारघर, नवी मुंबई ता. पनवेल, जि. रायगड,** यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविलेले आहे. त्याबाबतचा आवश्यक तो व्यवहार वर नमूद मालकांसोबत आमचे अशिलांनी ठरविलेला आहे.

**:: निवासी सदनिकेचे वर्णन ::**

मौजे खारघर, ता. पनवेल, जि.– रायगड येथील पनवेल महानगर पालिकेच्या हद्दीतील, सेक्टर ३५जी मधील भुखंड कं. ८,९,१० वर बांधण्यात आलेल्या **हाईड पार्क को. ऑप. हौ. सोसायटी लि.** या गृहनिर्माण संस्थेमधील बिल्डींग नं. ए–५ या इमारतीचे **तिसऱ्या वरील निवासी सदनिका क्र. ३०२, क्षेत्र ६७.२६ चौ. मिटर कारपेट (बाल्कनी, फ्लॉवरबेड, कपबर्ड, सर्व्हीस ऐरीया, आणि टेरेस यासह)** अशी मिळकत

तरी सविस्तरपणे नमुद केलेल्या निवासी सदनिकेबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. २२/०१/२०२४

**सही/–**
सौ. सुवर्णा म. वत्सराज
ॲडव्होकेट, पनवेल

पत्रव्यवहाराचा पत्ता :– फ्लॅट नं. ३०४, आदित्य विहार सोसायटी, महात्मा फुले रोड, जुन्या पोष्टाजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड. ४१० २०६.

## निवडक

### उद्यानातील खेळणी दुरुस्त

**नवी मुंबई :** सानपाडा सेक्टर ७ येथील संत शिरोमणी तुकाराम महाराज उद्यान येथे लहान मुलांची खेळणी,



ज्येष्ठ नागरिकांना विश्रांतीसाठी असलेले लाकडी बाकडे हे नादुरुस्त झाले होते. त्यामुळे किरकोळ इजा होऊन लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिक जखमी झाल्याच्या अनेक घटना येथे घडल्या होत्या. ही समस्या महापालिकेने मार्गी लावली. नवी मुंबई महापालिकेने या उद्यानातील लहान मुलांची खेळणी तसेच ज्येष्ठ नागरिकांना विश्रांतीसाठी असलेले लाकडी बाकडे आता दुरुस्त केले आहेत. त्यामुळे लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिक यांच्यात आनंदाचे वातावरण आहे. या उद्यानात अजून काही छोटी मोठी विकास कामे बाकी असून येत्या काही दिवसांत तीसुद्धा मार्गी लावली जातील.

### नेरूळमधील मंदिरात स्वच्छता

**नवी मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार नेरूळच्या भिमाशंकर मंदिरात माजी सभागृह नेते रवींद्र इथापे यांच्या माध्यमातून नमुंमनपा घनकचरा विभाग, व



स्थानिक नागरिक, विद्यार्थी आदींनी सहभागी होत भिमाशंकर मंदिर स्वच्छ करण्यात आले. या वेळी जनजागृतीपर किर्तनरुपी अभियान राबविण्यात आले. माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, निलेश पाटील, राजेश पाटील, भाजप वॉर्ड अधिकारी रवि डेरे, भिमाशंकर सोसायटी सेक्रेटरी संजय चव्हाण, भाजप तालुका उपाध्यक्ष रंगराव पाटील, डी.जी.पाटील, भिमराव सुर्यवंशी, राजेंद्र खिलारी, रवि पुजारी,भाजपा महिला अध्यक्षा योजना नलावडे, संचालिका भारती निघोट, संतोष फापाळे, शेखर भोर सह अन्य सहभागी झाले होते.

### पाताळगंगा नदीचे पूजन



**मोहोपाडा :** पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि पिल्लेज एचओसी कॉलेज मोहोपाडा रसायनी यांच्या संयुक्त विद्यमाने खालापूर तालुक्याची जीवनदानी पाताळगंगा नदीचे कृतज्ञा म्हणून पूजन करण्यात आले.दांडवाडी, तळवली आदिवासी वाडी येते साफसफाई करण्यात आली तसेच आंबिवली येथील भैरवनाथ मंदिर साफसफाई करण्यात आली. या वेळी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरुण गोविंद जाधव, निलेश जाधव, शिक्षिका कलावती उपाध्याय, विद्यार्थी नेहा म्हात्रे वैष्णवी, हर्ष, यश, कृष्णा आदींसह असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### रामलल्लाला महाप्रसाद अर्पण

**मोहोपाडा :** श्री स्वामीनारायण गुरुकुल इंटरनॅशनल



स्कूल चौक येथे विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील खाद्य पदार्थाचा रामलल्लाला महाप्रसाद अर्पण केला. या आनंद मेळाव्यामध्ये इयत्ता ज्युनियर केजी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध विविध पदार्थ आणून एकात्मतेचे दर्शन घडवून आणले. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोदक पुरणपोळीशिरा भाजी भाकरी असे विविध पदार्थ आणून सर्वांनी राम ललाला महाप्रसाद म्हणून अर्पण केला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे प्रमुख परमपूज्य विश्व मंगलदाजी स्वामीजी परमपूज्यब्रह्म स्वरूप दाजी स्वामीजी शाळेचे मुख्याध्यापक डॉ. श्री पी. हरी बाबू तसेच सर्व शिक्षकवृंद कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला.

# सर्वत्र रामनामाचा जयघोष







**नवी मुंबई : सह्याद्री गौरव प्रतिष्ठान नेरूळचा महाराजा गोविंदा पथकातर्फे सेक्टर १० श्री रामाची २० फुटी उभी करण्यात आलेली प्रतिमा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.**

## नवी मुंबईत विविध कार्यक्रम उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अयोध्येतील राम लल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त संपूर्ण नवी मुंबई शहरातही राम नामाचा जयघोष पाहायला मिळाला. संपूर्ण शहरात बेलापूर ते दिघा परिसरातील विविध मंदिरांमध्ये राम नामाच्या जयघोषाचे चित्र आहे.

सकाळपासूनच शहरातील विविध मंदिरांमध्ये भक्तिमय वातावरणात पूजा, होम हवन तसेच कलश दिंडी काढत मोठ्या प्रमाणात शहरातील नागरिकानी राम लल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सर्वच मंदिरांमध्ये गर्दी केली होती.

नवी मुंबई शहरातील प्रसिद्ध असणाऱ्या बेलापूर गावच्या राम मंदिरात रामभक्त मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी उपस्थित होते त्याचप्रमाणे मंदिरामध्ये सकाळपासूनच पूजा अर्चा सुरु होती. नवी मुंबई शहरातील बेलापूर नेरूळ सानपाडा वाशी कोपरखैरणे ऐरोली घणसोली अशा सर्वच विभागात असलेल्या विविध मंदिरांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

## पनवेलमधील ३२ मंदिरांत स्वच्छता आणि विद्युत रोषणाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामलल्ला प्राणप्रतिष्ठापना निमित्ताने प्रशासनाने दिलेल्या सूचनेनुसार पनवेल महापालिकेच्या वतीने मंदिरांची स्वच्छता,विद्युत रोषणाई व अयोध्या येथील थेट प्रक्षेपण करण्यात आले.

महानगरपालिका क्षेत्रात सध्या स्वच्छ तीर्थ अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी 'सुपर १५०' कर्मचाऱ्यांचे पथक तयार करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत चारही प्रभागातील सुमारे ३२ मंदिराच्या आतील भागाची व बाहेरील परिसराची स्वच्छता करण्यात आली होती. याच बरोबरीने राम लल्ला प्राण प्रतिष्ठापना निमित्ताने पनवेल महानगरपालिका मार्फत ३२ मंदिरावर विद्युत विभागाच्यावतीने रोषणाई करण्यात आली.

दरम्यान आज खारघर, पनवेल,कामोठे कळंबोली अशा चारही प्रभागांमध्ये राम लल्ला प्राण प्रतिष्ठापना निमित्ताने मिरवणूका, शोभायात्रा काढण्यात आल्या. कळंबोलीमधील राममंदिरामध्ये आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते श्रीराम प्रभूंची आरती करण्यात आली.

राम लल्ला प्राण प्रतिष्ठापना निमित्ताने विविध मंदिरांमध्ये महापालिकेच्या वतीने रांगोळ्या काढण्यात आल्या. तसेच मंदिरांसाठी डस्टबीन देण्यात आले. संध्याकाळी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली.



## ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल शहर यांचा २२वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन २० ते २१ जानेवारी या दरम्यान ज्येष्ठ नागरिक सभागृहात येथे करण्यात आले होते. या वर्धापन दिन सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत आयोजित कार्यक्रमाचे कौतुक केले.



दरम्यान, शनिवारी सायंकाळी स्वर बहार हा मराठी आणि हिंदी गिताचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे उपस्थित होत्या. या सोहळयात वयाची ७५ वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठ सभासदांचे आणि लग्नास ५० वर्ष पूर्ण झालेल्या जोडप्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मान चिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्याचे कौतुक केले आणि या वयातील त्यांचा प्रवास आमच्या सारख्या तरुणांना कायमच मार्गदर्शक ठरणारा आहे. तसेच जेष्ठ नागरिक संघ हा फक्त पनवेलचेच नाही तर संपूर्ण रायगडचे भूषण आहे असे मत व्यक्त केले. या वेळी उद्योजक जे. एम. म्हात्रे, अध्यक्ष जयवंत गुर्जर, उपाध्यक्ष माधुरी गोसावी, सचिव सुनील खेडेकर, सह सचिव भास्कर चव्हाण, नीला आपटे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## जरांगे पाटील यांनी सरकारला वेळ द्यावा -खा. तटकरे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

न्यायालयीन प्रक्रियेत टिकणारे आरक्षण देण्यासाठी अवधी लागणार आहे त्यासाठी राज्य सरकारला वेळ देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांनी केले. त्यांनी नेरूळ येथील आगरी कोळी महोत्सवास भेट दिली त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आरक्षण बाबत विचारण्यात आल्यावर प्रतिक्रिया दिली.

नवी मुंबई अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नामदेव भगत आयोजित आगरी कोळी महोत्सवाला तटकरे यांनी भेट दिली असता, त्यांनी मराठा आरक्षण आणि उद्याच्या राम मंदिर लोकार्पण सोहळ्यावर प्रतिक्रिया दिली.

सुनील तटकरे म्हणाले की, जरांगे पाटलांनी सरकारला वेळ द्यावा, कारण दोनवेळा न्यायालयाने नाकारलेले पक्के आरक्षण मिळण्यासाठी सरकार मनापासून प्रयत्न करत आहे, अशावेळी काही वेळ लागू शकतो त्यामुळे तो वेळ त्यांनी द्यावा,सर्व बाबींची पूर्तता झाल्यास पक्के आणि टिकणारे आरक्षण मिळू शकेल आणि मराठा बांधवांना खऱ्या अर्थानं न्याय मिळेल, मात्र यासाठी वेळ देणे आवश्यक असून जरांगे पाटील यांनीही वेळ देण्याची विनंती प्रसिद्धी माध्यमाद्वारे करीत आहे असेही तटकरे यांनी सांगितले.

## खारघरमध्ये संत रोहिदास महाराजांचे मंदिर तोडण्याच्या कारवाईला स्थगिती

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील संत रोहिदास महाराज यांच्या मंदिर तोडण्याच्या कारवाईला महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या आदेशानुसार स्थगिती मिळाली, अशी माहिती गटई कामगार युनियनचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव माजी नगरसेवक शिवदास कांबळे यांनी दिली आहे.

चर्मकार समाजाचे थोर संत रोहिदास महाराज यांचे मंदिर गेली १८ वर्ष सेक्टर १९ खारघर येथे कार्यरत आहे या मंदिरात चर्मकार समाजातील सगळे नागरिक बंधू-भगिनी उपासना धार्मिक कार्य आणि पूजा-अर्चा यासाठी येत असतात. त्याचबरोबर या मंदिराच्या माध्यमातून राष्ट्रपुरुष, संत व महात्मे यांच्या जयंती पुण्यतिथी साजरा होत असून सामाजिक न्यायाचे व समाज उपयोगी उपक्रम ही राबवले जातात त्या मंदिरांच्या जडणघडणीमध्ये स्थानिक सर्व समाजातील लोकांचा सहभाग असून त्यामध्ये जगदीश ठाकूर हे अग्रेसर आहेत. मंदिर तोडण्याची कारवाई करण्यास संबंधातील नोटीस सिडकोच्या वतीने जारी केली त्याचबरोबर मोठ्या पोलीस फाट्यासह सिडको मंदिर तोडण्याची कारवाई सुरू केली होती.

या दरम्यान महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदित्य तटकरे यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांना पत्र पाठवले आणि त्यानुसार सिडकोने या संबंधात कोणतीही कारवाई सध्या करणार नसल्याची भूमिका घेतलेली आहे, परंतु विशेष बाब म्हणून चर्मकार समाजासाठी आणि संत रोहिदास महाराज यांच्या मंदिरासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी विनंती गटई कामगार युनियनचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव माजी नगरसेवक शिवदास कांबळे यांनी केली असून या संबंधात लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून हा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे सांगितले आहे.

## कळंबोलीत शिवजयंतीनिमित्त साकारणार वाघनखांची प्रतिकृती

**पनवेल : वार्ताहर**

दरवर्षी कळंबोलीमध्ये घाटी मराठी संघटनेच्या माध्यमातून शिवजयंती मोठ्या थाटात साजरी केली जाते, अनेक समाजउपयोगी कार्यक्रम करत असतानाच इतिहासाची आठवण व्हावी या उद्देशाने घाटी मराठी संघटनेतर्फे गेली चार वर्षे शिवरायांच्या इतिहासाशी निगडित भव्य वस्तुंचे प्रदर्शन पंकज सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून केले जाते. त्यानुसार यंदाच्यावर्षी तब्बल सात फुट आणि १५० किलो वजनाच्या वाघनखांची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे.

२०१० पासून सुरु केलेली ही परंपरा घाटी मराठी संघटनेचे पदाधिकारी मोठ्या उत्साहात पार पाडतात. २०२० साली संघटनेतर्फे बनवलेल्या १२ फुट जिरेटोपाने महाराष्ट्रात सर्वांचे लक्ष वेधुन घेतले होते, अनुक्रमे २०२१ साली ८ फुट तलवार आणि २०२२ साली ८ फुट राजमुद्रा अजूनही कलंबोलीकरांच्या ध्यानात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची अफजल खानाचा वध करताना वापरलेल्या वाघनखांची ७ फुट लांब आणि १५० किलो वजनाची प्रतिकृति या वर्षी लक्ष वेधुन घेणार आहेत.

घाटी मराठी संघटनेचे संस्थापक कै. संतोषभाऊ गायकवाड़ यांनी सुरू केलेल्या शिवजयंतीला आजही मोठ्या थाटात १०१ मशालिंची मानवंदना देवून आणि पाळना गावून १८ तारखेला रात्री १२ वाजता शिवजन्मोस्तवाने सुरुवात होते. २०२३ च्या शिवजयंतीची जय्यत तयारी संदीप जाधव, किरण गायकवाड़, शैलेश धूमाळ, दत्ता पीसाळ, रोहित खराडे, मंगेश सावंत, आबा इंगळे आणि.पंकज सूर्यवंशी यांच्या माध्यामातुन सुरु आहे.

## उलवे येथे रामनाम संगीत विज्ञान सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अयोध्या येथे होत असलेल्या श्री प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वीणा वेणू आर्ट फाऊंडेशन या आध्यात्मिक संस्थेच्या वतीने राम विश्व नाद-राम नाम संगीत व विज्ञान



सोहळा उलवे येथे मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

लोकांना राम नाम जपाचं, संकीर्तनाचं आणि त्याच संदर्भात त्याचा शरीर आणि मनावर उत्तम चिकित्सकीय प्रभाव कसा होतो याची माहीती व सखोल ज्ञान लोकांना देणे हा त्यामागील हेतू होता.

आयुष्य म्हटलं की पैसा मिळविण्यासाठी आणि उन्नती म्हटली की त्या कामाच्या बदल्यात पैसा मिळवने जोडले जाते. या संपूर्ण आवर्तनाने आपल्या जीवनाला व्यापून टाकलं आहे, आपण खरे कोण हे आपलं आपल्यालाच कळत नाही असे वीणा वेणू संस्थेच्या संस्थापक आणि संचालक डॉ. राधिका वीणा साधिका यांनी बोलताना सांगितले.

राधिका विना यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना सांगितले की, रामनाम संगीत हे फक्त गाणं केव्हा वाजवणं नसून परम ज्ञान, परम ब्रम्हाचा उच्चार आहे, म्हणून आम्ही संगीत हे फक्त शिकवत नाही आपल जीवन हेच कसं संगीत करावं या कलेचं ज्ञान देतो, असं वीणा वेणू संस्थेच्या संस्थापक आणि संचालक डॉक्टर राधिका वीणासाधिका यांनी बोलताना सांगितले.

या वेळी रामनाम गीताच्या रचनेचे गायन फाऊंडेशन च्या विद्यार्थ्यांनी सुंदर केले. डॉ. राधिका यांनी चिकित्सकीय आणि वैज्ञानिक संदर्भात राम आणि त्यांचा जीवनाचा विचार मांडला, मुख्य अतिथी सनी साईसा यांनी प्रभू श्री रामाचे चरित्र लोकांना समजावून सांगितले.

## रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त खांदा कॉलनीमध्ये विविध कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त खांदा कॉलनीतील निल्स लेक व्हू सोसायटीत विविध कार्यक्रम झाले.

या वेळी जयंत देशपांडे यांनी प्रवचन सादर केले. ते 'युनिसेफ'चे राज्य सल्लागार म्हणून काम करीत आहेत. वारकरी सांप्रदायाचे अभ्यासक म्हणून ते महाराष्ट्राला परिचित असून प्रचंड व्यासंग, चिंतन असलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांचे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगांवर चिकित्सा स्वरूपात पुस्तक प्रकाशित झालेले आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सोसायटी चेअरमन, सदस्य आणि रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भजन आणि रामरक्षा सामूहिक पठण होऊन सर्वांना प्रसाद देण्यात आला.



## जावळीकर राव मोरे कुलोत्पन्न परिवाराचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राजे चंद्रराव मोरे कुलोत्पन्न जावळीकर राव मोरे परिवाराचे ऐतिहासिक असे स्नेहसंमेलन आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे झाले. स्नेहसंमेलनास ठाणे, पालघर, सातारा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून जवळपास ५० गावातील ६०० राव मोरे परिवारातील बंधू-भगिनी उपस्थित होते.

स्नेहसंमेलनात मोरे परिवारातील विविध क्षेत्रातील बंधू-भगिनींचा राजे चंद्रराव पुरस्कार देऊन कौतुक करण्यात आले. गोवंश संरक्षक पुरस्कार, शैक्षणिक पुरस्कार, क्रीडा पुरस्कार, विरनारी पुरस्कार, प्रशासकीय शौर्य पुरस्कार, मरणोत्तर शौर्य पुरस्कार, प्रशासकीय सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संस्थेच्या अधिकृत संकेत स्थळाचेदेखील मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

जावळीकर राव मोरे परिवाराच्या स्नेहसंमेलनास इतिहास अभ्यासक शिल्पा प्रधान-परब प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. सचिव विनोदराव मोरे,अध्यक्ष सुहासराव मोरे यांनी ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ राजे चंद्रराव मोरे यांचे तैलचित्र येत्या काळात उपलब्ध केले जाईल, असे सांगितले.

## निवडक



### डॉ. कटकदौंड यांच्या एकांकिकेचे प्रकाशन

**खोपोली** : खोपोलीतील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुभाष कटकदौंड यांच्या दोन पेग या एकांकिकेचा प्रकाशन कोमसापच्या जिल्हा साहित्य संमेलनात संस्थापक मधु मंगेश कर्णिक आणि विधानसभा आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते शनिवारी (दि.२०) झाले. संमेलनाचे प्रमुख सुधीर शेठ आणि आयोजकांनी या दोन दिवसांच्या संमेलनाचे उत्कृष्ट नियोजन केले. संमेलनास २०० साहित्यिक उपस्थित होते. दोन पेग हे डॉक्टरांचे प्रकाशित झालेले तेरावे पुस्तक आहे. थोर साहित्यिक कै. र. वा. दिघेंच्या चरणाने पवित्र झालेल्या खोपोलीत डॉ. सुभाष कटकदौंड साहित्यिक वारसा पुढे नेण्याचे मोलाचे कार्य करीत आहेत.

### वावंढळमध्ये दोन शाळांचे बांधकाम

**चौक** : वावंढळ येथील दोन जुन्या शाळेच्या इमारतींचे नव्याने बांधकाम अल्काईल अमाईन्स केमिकल लिमिटेड पाताळगंगा रसायनी यांच्या सीएसआर निधीतून करण्यात येत असून त्याचा भूमिपूजन सोहळा सरपंच सुहास कदम यांच्या हस्ते करण्यात आला. अल्काईल अमाईन्स केमिकल कंपनीला शाळेच्या शिक्षकांनी आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधून कंपनीला विनंती करण्यात आली. स्वामित्व धनदायित्व प्रमुखांनी शाळेला भेट देऊन पाहणी केली व नव्याने बांधकाम करण्याचे आश्वासन दिले. या इमारतींचा पुनर्विकास करण्याचा शुभारंभ करण्यात आला.



**नागोठणे : नागोठण्यात श्रीराम मंदिरात अनेक भक्तगणांनी प्रभू श्रीरामचे दर्शन घेतले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, सदानंद गायकर, भाजप नेते मारुती देवरे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, तानाजी लाड, ॲड. श्रीकांत रावकर, मुकुंद मोदगी, मंदिर विश्वस्त कमिटी अध्यक्ष राजन उपाध्ये व रवींद्र भिडे उपस्थित होते.**

# रोह्यात महिलांसाठी आदि‘ती’ महोत्सव

## ■ बचत गटातील वस्तूंचे प्रदर्शन ■ अभिनेत्री तन्वी मुंडलेची उपस्थिती

**रोहे** : **प्रतिनिधी**

रोहा अष्टमी शहर व रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शहरातील कुंडलिका नदी संवर्धन येथे महिलांसाठी आदि ’ती’ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्‌घाटन वरदा सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी गणपती, दिवाळी वगळता महिलांसाठी कार्यक्रमात सहभागी होता येत नाही. हे सण वगळता सातत्याने ती कामात व्यस्त राहते. यामुळे महिलांना मनमोकळे आनंद लुटण्यासाठी आदि ’ती’ या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. वर्षभर आम्ही होम मिनिस्टरसह अन्य कार्यक्रम महिलांसाठी घेत असल्याचे त्यांनी सांगितले.





या महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी वरदा तटकरे यांनी आदि’ती’ म्हणजे तुम्ही. तिचा सत्कार म्हणजे आदि ’ती’ महोत्सव होय. महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे असून या महिलांना संधी मिळावी व त्यांना आनंद मिळावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास अभिनेत्री तन्वी मुंडले, माजी नगराध्यक्ष रत्नप्रभा काफरे, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्षा प्रितम पाटील, शहराध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष पुजा पोटफोडे, श्रद्धा पाटणकर, शिल्पा धोत्रे, युवती तालुकाध्यक्ष रविना मालुसरे, अमिता शिंदे, स्वरांजली शिर्के, शहर राष्ट्रवादी अध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, मयुर दिवेकर, मजीद पठाण, माज सवाल उपस्थित होते.

या महोत्सवात तालुक्यातील महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पादनाचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते. या महोत्सवात विविध नृत्य, लोकगीतांसह विविध गीत सादर करण्यात आले. या गीतांवर उपस्थित महिलांनी ठेका घेत मनमुराद आनंद लुटला आहे. या वेळी महिलांना पैठणी देण्यात आले. लकी ड्रॉच्या माध्यमातून विविध बक्षिसे देण्यात आले.

आदि ’ती’ महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणून भाग्य दिले तू मला या मराठी मालिकेतील प्रसिद्ध अभिनेत्री तन्वी मुंडले यांनी महिलांशी संवाद साधला. पायाला लागले असल्याने ना. आदिती तटकरे यांनी स्कुटरवर बसुन कार्यक्रमस्थळी प्रवेश केल्याने त्यांची एंट्री लक्षवेधी ठरली. महिलांनी या महोत्सवात लावलेल्या विविध खाद्यपदार्थ स्टॉलवर जाऊन खाण्याचा आनंद लुटला. या उत्सवाला तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# चौक परिसरात राममय वातावरण

**चौक** : **प्रतिनिधी**

अयोध्या येथील राममंदिरात होत असलेल्या राममूर्तीच्या प्राणप्रतिष्ठानिमित्त चौक परिसरातील विविध गावच्या मंदिरात धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे या परिसरात राममय वातावरण निर्माण झाले आहे.





अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर सोमवारी अयोध्या येथे नव्याने उभारण्यात आलेल्या राम मंदिरात श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होत असताना चौक परिसरातील विविध गावच्या मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दोन दिवस अगोदरच सुरू होती. मंदिर स्वच्छता, परिसर स्वच्छता, गावस्वच्छता, मंदीर परिसरात, घरासमोर, रस्त्याच्या कडेला रांगोळी काढणे, फुलांच्या माळांनी मंदिर, घर सजवणे, दारात तोरणे, आकाशकंदील, अनेक प्रकारच्या सजावटीने धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. पुजा अर्चा, अभिषेक, सकाळी काकडा आरती, सायंकाळी हरिपाठ, जागर भजन, प्रवचन कीर्तन, प्रसाद, महाप्रसाद व शोभायात्रेने अयोध्या येथील राममंदिर प्राणप्रतिष्ठान कार्यक्रम झाला.

वावंढळवाडी येथील श्रीराम मंदीर, वावंढळ येथील आई जानाई ईंजाई मंदिर, भिलवले येथे हनुमान मंदिर, विणेगाव येथील विठ्ठल मंदिर, कांढरोली येथील हनुमान मंदिर, वरोसे येथिल श्रीराम मंदीर,चौक गावातील सुमारे २०० वर्षांपूर्वीच्या राम मंदिरात, आसरे, तुपगाव, लोधिवली, नढाळ, असरोटी, नडोदे,पाली अशा अनेक गावात निटनेटके पण सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे अलिबागमध्ये कारसेवकांचा सन्मान

**अलिबाग** : **प्रतिनिधी**

श्रीराम जन्मभूमी मुक्ती संघर्षामध्ये कारसेवा देण्यासाठी गेलेल्या सेवकांचा राष्ट्रीय स्वयंसेवक अलिबाग यांच्यातर्फे सोमवारी (दि. २२) सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय स्वयसेवक अलिबाग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या सन्मान सोहळ्यात संघाच्या घोष पथकाने या कार सेवकांना मानवंदना दिली. रघुजीराजे आंग्रे यांच्या निवासस्थान परिसरात झालेल्या या कार्यक्रमासाठी संपूर्ण तालुक्यामधून रामभक्त आले होते.

विश्व हिंदु परिषद राष्ट्रीय सहमंत्री ॲड. दिपक गायकवाड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. चेतन पटेल, डॉ, अमेय केळकर, रघुजीराजे आंग्रे या वेळी मंचावर होते. कारसेवकांनी आपले त्या वेळचे अनुभव कथन केले. ॲड. दिपक गायकवाड, रघुजीराजे आंग्रे यांनी यांनी या वेळी प्रबोधन केले.




# ‘हिरवळ’तर्फे आरोग्य आणि स्वच्छता विषयावर सेमिनार

**माणगाव** : **प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेजच्या महिला विकास कक्षामार्फत बुधवारी विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य आणि स्वच्छतेबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संध्या बुटाला उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्रा. सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवलकर, महिला विकास कक्षाच्या प्रमुख प्रा. वर्षा निकम कार्यक्रमाला उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

त्यांनी, शिक्षणाच्या वातावरणात आरोग्य आणि निरोगीपणाचे मूल्य अधोरेखित करण्यावर भर दिला. यानंतर डॉ. संध्या बुटाला यांनी पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज (पीसीओडी) या संप्रेरकाच्या असंतुलनामुळे महिलांच्या प्रजनन आरोग्यावर परिणाम करणाऱ्या पीसीओडीच्या गुंतागुंतीबद्दल अधिक तपशीलवार माहिती दिली. डॉ. बुटाला यांनी आधुनिक आहार, व्यायाम आणि जीवनशैलीच्या निवडींचा या प्रकारच्या आजारांवर कसा परिणाम होतो यावर विस्तृत माहिती दिली. पीसीओडीवर उपचार करण्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि जीवनशैलीतील बदल यांचा समावेश असलेल्या सर्वसमावेशक धोरणाच्या महत्त्वावर भर दिला. निरोगी पुनरुत्पादक चक्र टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या निर्णय घेताना सजगता बाळगण्याचे आवाहन केले.

ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी, अनेक लोकांच्या व्यस्त जीवनशैलीच्या प्रकाशात आरोग्य आणि स्वच्छताविषयक जागरूकता वाढवण्याच्या दृष्टीने स्वच्छता व आरोग्य यावर आपले विचार मांडले.

# माणगावात पिकअप टेम्पोची ट्रकला धडक; दोघे जखमी

**माणगाव** : **प्रतिनिधी**

माणगावजवळील नाणोरे गावचे हद्दीत एकता पेट्रोल पंपाजवळ मुंबई–गोवा महामार्गावर पिकअप टेम्पोने विरुद्ध दिशेला येत समोरून ट्रकला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघे जण जखमी झाले आहेत.



हा अपघात रविवारी (दि.२१) मध्यरात्री १:३० वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताची फिर्याद मोहम्मद नईम गफारमिया (वय ३६, रा. कळंबोली मूळ. रा. झारखंड) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. ट्रकचालक मोहम्मद नईम गफारमिया हे त्यांच्या ताब्यातील ट्रक (एमएच ४६ सीएल ७५५३)जयगड ते कळंबोली असा मुंबई–गोवा महामार्गाने जात असताना मुंबई बाजूकडून येणारा पिकअप टेम्पोवरील चालकाने त्याच्या ताब्यातील पिकअप विरुद्ध दिशेला आणल्याने समोरून ट्रकला धडक लागली. या अपघातात टेम्पोचालक रवी दादासो पवार (वय २६) व रोहन रघुनाथ भानसे (वय १८, दोघेही राहणार ढालघर, ता. माणगाव) जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या अपघाताचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सानप करीत आहेत.


# रोहा शहरात विविध धार्मिक कार्यक्रम

**रोहे** : **प्रतिनिधी**

अयोध्येत उभारण्यात आलेल्या श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा होत असून या उत्सवानिमित्त रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात आले. संपूर्ण वातावरण राममय झाल्याचे दिसून आले.

श्री राममंदिर सजले असून मंदिरात दर्शनासाठी सकाळ पासुन रामभक्तांची गर्दी झाली. रोहा शहरातील राममंदिरात सकाळी अभिषेक, गणपती पुजन, पुण्याह वाचन, हवन, क्षेत्रपाल, पूर्णाहुती, आरती आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले.

मंदिरात धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.तालुक्यात श्रीरामाचे चित्र असलेले भगवे झेंडे लावले होते.गृहणींनी घरासमोर रांगोळ्या काढल्या होत्या. ठिकठिकाणी श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा हा उत्सव म्हणून साजरा करण्यात आला. फटाक्यांची आतिषबाजी सकाळी करण्यात आली, तर मंदिरात व घरासमोर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. जय श्रीरामचा जयघोष करण्यात येत होते.



# पेण नगर परिषदेतर्फे स्वच्छता मोहीम

## दर महिन्याला मोहीम राबिवण्याचा निर्धार

**पेण** : **प्रतिनिधी**

पेण शहर सुंदर व सुशोभित करण्याच्या दृष्टीने नगर परिषदेतर्फे शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली, तसेच शहर सुंदर व स्वच्छ राखण्याकरिता अभियान राबविण्यात आले.



पेण नगर परिषदेतर्फे शहरात दररोज स्वच्छता करण्यात येते, परंतु याव्यतिरिक्त महिन्यातून किमान एकदा विशेष स्वच्छता मोहीम राबवून पेण शहर स्वच्छ व सुंदर करण्याचा मनोदय मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी या वेळी व्यक्त केला. या अभियानात मुख्याधिकारी जीवन पाटील, नगर अभियंता सुहास कांबळे, स्वच्छता अभियंता अंकिता इसाळ, आरोग्य निरिक्षक शिवाजी चव्हाण, विद्युत अभियंता रेश्मा करबेले, संगणक अभियंता निकिता पाटील, महेश वडके, उमंग कदम, भरत निंबरे, किशोर जाधव, स्वच्छता निरिक्षक दिलीप गायकवाड, गौतम मोरे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

या स्वच्छता अभियानाची सुरुवात पेण नगर परिषदेचे मुख्य प्रवेशद्वारापासून करण्यात आली. आवश्यक त्या ठिकाणी स्टील डस्टबिन बसविण्यात आले. रस्त्याच्या दुतर्फा औषध फवारणी करण्यात आली. रस्त्यालगतची गटारांची माती उचलण्यात आली. पेण नगर परिषदेचे सर्व कर्मचारी व नागरिक असे एकण १३० जणांच्या मदतीने अभियान यशस्वी करण्यात आले.

# अंजुमन इस्लाम हायस्कूलमध्ये शैक्षणिक कार्यशाळा

**मुरूड** : **प्रतिनिधी**

शिक्षण हे ऑक्सिजनसारखे आहे. जसे जगण्यासाठी ऑक्सिजन घ्यावा लागतो त्याचप्रमाणे समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण हे मिळालेच पाहिजे, असे प्रतिपादन प्रथितयश उद्योजक तथा गल्फ लाईट्स दोहा समुहाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सनाउल्लाह घरटकर यांनी केले.

मुरूड अंजुमन इस्लाम हायस्कूलमध्ये डॉ. सनाउल्लाह घरटकर फाउंडेशनतर्फे शिक्षण आणि प्रगती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष हसन चौगुले, माजी उपकुलगुरु प्रा. अख्तरुल वासे, अलिगड मुस्लीम विद्यापिठाचे प्रेसिडेंट डॉ. नदिम महिर, अंजुमन हिमायतुल डिग्री कॉलेज, महाडचे प्राचार्य डॉ. मुब्बशीर जमादार, कोकण–ए–खतिबचे अध्यक्ष अली शम्सी, घरटकर फाउंडेशनचे अध्यक्ष राशीद फहीम, रायगड मुस्लीम वेलफेअर संघटनेचे अध्यक्ष मुस्तफा पोंजेकर, मामिन पेट्रोलियमचे संचालक मसूद पेशीमाम, मुफ्ती रफिक पुरकर, मुरूड माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी उपनगराध्यक्ष अतिक खतीब, शाहिद कलाब, विनोद वाघ, डॉ. मकबुल कोकाटे आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. सनाउल्ला घरटकर यांनी संपादित केलेले इस्लाही मुआशिरा और हमारी जिम्मेदारी या पुस्तकाचे विमोचन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात संजीवनी आरोग्य केंद्र तसेच मुरूड नगर परिषद महोत्सव समितीतर्फे डॉ. घरटकर यांचा जाहीर सन्मान करण्यात आला.



